शनिवार, दि. २८ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘त्या’ डॉक्टरांची डिग्री रद्द करुन प्रॅक्टीस बंद करण्याची मागणी

## जिल्हाधिकारी यांना प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** आस्था हॉस्पीटलच्या डॉक्टरांनी सर्वच पत्रकारांबद्दल केलेल्या वक्तव्याच्या प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना व पत्रकारांच्यावतीने निषेध करण्यात आला असून शुक्रवार (दि २७) रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. पत्रकारांच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी गणेश म हाडिक यांची भेट घेत त्यांना प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आणून देत त्या डॉक्टरांची डिग्री रद्द करण्यात येऊन त्यांची प्रॅक्टीस बंद करण्याची मागणी केली आहे. श्री म हाडीक यांनी शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून कारवाईचे आश्वासन दिले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आस्था हॉस्पीटल, राजुर रोड कॉर्नर, भोकरदन नाका जालना, येथील प्रशासनातील डॉक्टरांची पत्रकारांबद्दल हीन भावना आहे. या संदर्भातील व्हिडीओ प्रचंड व्हायरल झालेला असून दै. जगाचा जगमित्र, दै. गजकेसरी नायक, दै. युवा आदर्श, दै. सत्यवार्ता सम ाचार यासह विविध वृत्तपत्रांत युट्युबवर वृत्त - व्हिडीओ प्रकाशित झालेले आहेत. यात आस्था हॉस्पीटलचे डॉक्टर हे बोलतांना म्हटले आहे की, पत्रकार म्हणून पहिले सांगितले असते तर रुग्णास ॲडमिट करुन घेतले नसते, पत्रकारांचा मुड चेंज होतो, आम्ही पत्रकारांना ॲडमिट करून घेत नाही. असे म्हणत हात जोडत पत्रकारांपासून दूर राहतो असल्याचे म्हटले आहे. आस्था हॉस्पीटलच्या डॉक्टरांचे असे वागणे डॉक्टरी पेशाला शोभत नाही. त्यांनी एखाद्या विशिष्ट सम ाहाचा द्वेष करणे योग्य नाही. पत्रकारांचा या डॉक्टरांना द्वेष असल्याचे व्हिडीओवरून स्पष्ट होते. अशा डॉक्टरांची मानसिकता पाहता डॉक्टर हे इतर जात-धर्म-समुहाचाही द्वेष करतात याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी रुग्णांचा उपचार योग्य प्रकारे होणार नाही. शिवाय ज्या मृत रुग्णाच्या नातेवाईकास हे डॉक्टर बोलत आहे. त्या मृत व्यक्तीच्या मृत्यूची नेमकी कारणे शोधून यात डॉक्टरांचा हलगर्जीपणा आहे की कसे हे तपासणे ही आवश्यक आहे. डॉक्टरांच्या बेजबाबदार वागण्यामुळे आस्था हॉस्पीटलमधील सर्वच डॉक्टरांची डिग्री रद्द करण्याची कारवाई करण्यात यावी.

शिवाय योजनेसंदर्भातही बोलतां ना डॉक्टर म्हणतात की, केवळ पन्नास हजार रुपये योजनेतून मिळणार आहे. आणि ते देखील तीन महिन्यांनंतर मिळतात. आम्ही आपल्याला मदत म्हणून हे करतोय. याचा विचार करता योजनेत शासन एखाद्या आजाराचा अर्धवट खर्च देते का? असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आस्था हॉस्पीटल प्रशासनाने एकप्रकारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची खोटे बोलून आर्थिक लुट करत असल्याचे स्पष्ट होते आहे. त्यामुळे आस्था हॉस्पीटलमधील सर्व प्रकारच्या शासकीय योजना तात्काळ बंद करण्यात याव्यात अशी मागणीही निवेदनाद्वारे केली आहे.

डॉक्टरांची मानसिकता, बेजबाबदारपणा आणि त्यांची एकंदरीत वागणूक पाहता त्यांची डिग्री रद्द करून त्यांची प्रॅक्टीस बंद करण्यासाठी योग्य ती पावले उचलण्यात यावी. जेणे करून भविष्यात केवळ पत्रकारच नव्हे तर कोणत्याही जात-धर्म-समुहाचा द्वेष ठेवणाऱ्या डॉक्टरांकडून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची वित्त, जीवीत अथवा ईतर कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही. या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून येत्या पंधरा दिवसांत कारवाई करण्यात यावी. अन्यथा प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला.

निवेदनावर प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, शहराध्यक्ष सुहास वैद्य यांच्यासह शेख ईलियास अब्बास, आमेर खान, संदीप भाकरे, शेख शकील, सुनील भारती, चेतन साबळे, नरेंद्र जोगड, सुनील नरवडे, तरंग कांबळे, बळीराम राऊत, आनंद शिंदे यांच्यासह पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कारभारावर संशय

आस्था हॉस्पीटलच्या डॉक्टरांकडून पत्रकारांबद्दल केलेल्या वक्तव्याचा निषेध व डॉक्टरांवर कारवाईच्या मागणीसाठी जालना जिल्हा शल्य चिकित्सक यांना निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिष्टमंडळाकडून निवेदन स्विकारण्यास काहीही न ऐकता चक्क नकार दिल्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कारभारावर संशय व्यक्त होत असल्याची प्रतिक्रिया पीसीएम जालनाचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी माध्यम ांशी बोलतांना दिली. ते म्हणाले की, एखाद्या हॉस्पीटलच्या डॉक्टरांची तक्रार ऐकून घेण्यासाठी जर जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे वेळ नसेल याचा अर्थ हॉस्पीटलचे डॉक्टर आणि त्यांच्यात काही हितसंबंध असण्याी दाट शक्यता आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी लक्ष घालून जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कारभाराचीही चौकशी करावी अशी मागणी यावेळी श्री शेळके यांनी केली.

### चौकशीसाठी समिती नेमावी - शेळके

पत्रकारांबद्दल हिन भावना ठेवणाऱ्या डॉक्टरांवर कारवाईच्यामागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी निवेदन स्विकारले. यावेळी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने त्यांना प्रकरणाचा व्हिडीओ दाखवला व प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. यावर श्री महाडीक यांनी कारवाईचे आश्वासन देत जिल्हा शल्य चिकित्सकांना चौकशीसाठी कळविण्यात येणार असल्याचे सांगितले. मात्र, जिल्हा शल्य चिकित्सक यांनी पत्रकांकारांचे या संदर्भानेच निवेदन घेतले नाही. त्यामुळे त्यांच्याकडे प्रकरण वर्ग न करता संपूर्ण प्रकरणासाठी एखादी समिती नेमूण तपास करावा, अशी मागणी पीसीएम जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी माध्यमांशी बोलतांना केली.

जालन्यात आज वक्फ वाचवा परिषद

# वक्फ कायद्यातील दुरुस्त्यांविरोधात इस्लामी विद्वानांचा आवाज

**जालना । प्रतिनिधी -** नुकत्याच मंजूर करण्यात आलेल्या वक्फ (सुधारणा) कायद्याविरोधात जनजागृती आणि जनमत तयार करण्याच्या उद्देशाने, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या (IMPLB) ताहाफ्फ ुज-ए-अवकाफ समितीच्या वतीने जालना येथे शनिवारी, २८ जून रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत जुन्या जालना ईदगाह मैदानावर भव्य ‘वक्फ वाचवा’ परिषद आयोजित करण्यात आली आहे.

संयोजकांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, या परिषदेचे उद्दिष्ट वक्फ कायद्यातील दुरुस्त्यांचे परिणाम लोकांसमोर मांडणे व देशभरातील वक्फ मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सामूहिक कृतीची रणनीती ठरवणे हे आहे.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचे अध्यक्ष खालिद सैफुल्लाह रहमानी असतील.

खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार राजेश टोपे, माजी आमदार कैलास गोरणट्याल, शिवसेना जिल्हा अध्यक्ष भास्कर अंबेकर आणि डॉ. संजय लाखे पाटील हे देखील या परिषदेच्या उपस्थितीत राहणार आहेत.

IMPLB तसेच अन्य प्रमुख इस्लामी संघटनांचे अनेक म ान्यवर वक्ते यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

त्यामध्ये मौलाना फजलुर रहीम मुजद्दिदी (महासचिव, IMPLB), मौलाना उमरैन महफूज रहमानी (सचिव, खचझडइ), इलियास खान फलाही (अध्यक्ष, जमात-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्र ), मौलाना असगर अली मेहदी (उपाध्यक्ष), मौलाना हलीमुल्लाह कासमी (अध्यक्ष, जमीयत उलेमा अरशद मदनी - महाराष्ट्र), मौलाना हाफिज म ोहम्मद नदीम सिद्दीकी (अध्यक्ष, जमीयत उलेमा महमूद मदनी - महाराष्ट्र), जियाउद्दीन सिद्दीकी (अध्यक्ष, वहदत-ए-इस्लामी हिंद), ॲड. अझहर तांबोळी (अध्यक्ष, SDPI) यांचा सम ावेश आहे.

तसेच खचझडइ चे सदस्य मलिक मोअतासिम खान, महफ ूज-उर-रहमान फारुकी, मुफ्ती मोईजुद्दीन कासमी, रफिउद्दीन अशरफी हेही या परिषदेचे म ार्गदर्शक वक्ते असतील.

ही माहिती परिषदेचे सम न्वयक मौलाना अब्दुल रऊफ नदवी यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिली आहे.

# खासदार डॉ.कल्याण काळे यांनी घेतली खत टंचाई बाबत आढावा बैठक

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात खत टंचाई बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात, जालना येथे शुक्रवार (दि २७) रोजी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बैठक घेऊन ऐन खरीपाच्या पेरणीच्या तोंडावर खत टंचाई बाबत आढावा घेतला ही कृत्रिम खत टंचाई आहे खत कंपन्या जाणीवपूर्वक पुरवठा करत नाहीत शेतकरी चढ्या दराने खत खरेदी करतो २०० लाख मे टन खताचं उद्दीष्ट आहे जुन महिन्यात ८७००० हजार मे टन वितरणात आलेल आहे युरीया खताचा तुटवडा जाणीवपूर्वक केला जातो खता सोबत इतर उपवस्तु जबरदस्तीने दिल्या जातात त्यासाठी युरीयाची अट घातली जाते तसेच डीएपी खताची सुद्धा मोठ्या प्रमाणात टंचाई जिल्ह्यात जाणवत आहे. शेतकऱ्यांच्या




पान २ वर

# टेंभुर्णी येथे रविवारी जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघाच्यावतीने रविवारी दिनांक २९ रोजी टेंभुर्णी ता. जाफराबाद येथे श्री जगन्नाथ रथयात्रा महाम होत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी दोन वाजता जय जगन्नाथ किराणा येथून रथयात्रेस प्रारंभ होणार आहे. येथील संत सावता मंगल कार्यालयात जगन्नाथ कथा आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

रास गोविंद प्रभू, संकीर्तन रस प्रभू जगन्नाथ कथा सादर करतील. महाआरती आणि महाप्रसादाने या कार्यक्रमाचा समारोप होईल टेंभुर्णी सह परिसरातील कृष्णभक्त आणि भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन इस्कॉन च्या वतीने करण्यात आले आहे




# कत्तलीसाठी डांबुन ठेवलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका

पोलिसांची कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** येथील कुरेशी मोहल्ला भागात ६० वर्षीय शकिल कुरेशी याने १६ गोवंशीय जनावरं एका वाडयात कत्तल करण्याच्या उद्देशाने डांबुन ठेवल्याची माहीती पोलिसांना मि ळाली होती.या माहितीवरून पोलिसांनी शकिल कुरेशी राहत असलेल्या घरावर छापा टाकला. या कारवाईत १६ गोवंशीय जातीचे गोवंश मिळून आले आहेत.

कुरेशी मोहल्ला जुना जालना येथे शकिल बासेद कुरेशी वय ६० वर्षे, रा. कुरेशी मोहल्ला जुना जालना याने १६ गोवंशीय जनावरे एका वाडयामध्ये दाटीवाटीने कत्तल करण्याचे उद्देशाने डांबुन ठेवली असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना मिळाल्याने सदर ठिकाणी कारवाई करणे करीता स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन सोबत मदतीला पोलीस स्टेशन कदिम जालना येथील अधिकारी व स्टापसह मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी काल दिनांक २६/०६/२०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास छापा मारला असता शकिल बासेद कुरेशी वय ६० वर्षे, रा. कुरेशी मोहल्ला जुना जालना याने त्याचे वाडयामध्ये १६ गोवंशीय जातीचे लाल, तांबडया, काळया, पांढऱ्या रंगाचे बैल व गोऱ्हा असे एकुण किंमती २,४०,०००/- रु.किंमतीचे डांबुन ठेवल्याचे मिळुन आल्याने सदरची गोवंशीय जनावरे हे ताब्यात घेऊन ते गोरक्षण पांजरापोळ

पान २ वर

युवा आदर्श

### महाभूमी ...

डिजिटल क्रांती रे
महाभूमी ॲपद्वारे
कृषी क्षेत्रास उभारी
उघडी नाविन्य दारे
व्हाटसॅप वरी मिळे
सर्व सातबाराउतारे
सुखावती कृषिवल
चमकले नशीबतारे
सगळे सहजी सोपे
सहजचं क्लिककरे
क्षणी माहितीसमोर
दिवस येणारं रे बरे
तलाठी महोदयाचे
कमी होतीलं नखरे
कशी मिटे खुजली
आता काही न खरे
ग्रामसेवका लागेल
विचीत्र दुखणे दुखरे
बळीराजाचे नशीबी
येईल जरासे सुख रे
नको कागदी लगदे
संपले बाड बिस्तरे
लाचखोरधास्तावले
भ्रष्टाचार आता पुरे

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा झाडे जगवा

## संपादकीय

### देशी वृक्षांची लागवड करा

मागील काही वर्षात शहरात सिमेंटच्या जंगलाने गर्दी केली आहे. मोठमोठ्या इमारती आणि टॉवर्स उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली आहे. जितक्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली तितक्या प्रमाणात वुक्ष लागवड करण्यात आली नाही. परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडले. त्याचा परिणाम तापमान वाढीवर झाला. तसेच बेसुमार वृक्षतोडीमुळे अनियमित पाऊस, उष्णता अशा संकटांना तोंड द्यावे लागले. यावर मात करण्यासाठी गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्र सरकारने वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. दरवर्षी या मोहिमेअंतर्गत लाखो वृक्षांची लागवड केली जाते. या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, विविध सामाजिक व सेवाभावी संस्था, तरुण मंडळांनी यात हिरीरीने भाग घेतला. नागरिकांनीही आपल्या घराजवळ, बागेत, शेतात मोकळ्या जागेत, माळरानावर वृक्षारोपण केले. यावर्षीही ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे. या वृक्षारोपण मोहिमेत परदेशी वृक्ष मोठ्या प्रमाणावर लावण्यात येतात. जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करणे आवश्यक असताना ज्या परदेशी वृक्षांची आपल्याला आवश्यकता नाही ; त्यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. परदेशी वृक्षांमुळे जैवविविधता मोठ्या प्रमाणावर नष्ट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे वाढते तापमान, वातावरणातील बदल दूर करण्यातही परदेशी वृक्ष अपयशी ठरत आहे. देशी वृक्षांमुळे पावसाचे पाणी भूगर्भात टिकून राहते. विदेशी वृक्षांमुळे जमिनीची पाणी टिकवून ठेवण्याची क्षमता नाहीशी होते. दुष्काळामागे हे ही एक महत्वाचे कारण आहे. विदेशी झाडांच्या आम्लयुक्त पानांमुळे जमिनी नापीक होत आहे. विदेशी झाडांच्या फुलात परागकण नसतात त्यामुळे त्यावर फुलपाखरे किंवा भुंगे यासारखे कीटक येत नाहीत. विदेशी झाडांच्या पानांनी आणि सावलीने जमीन निकृष्ट होत आहे. या वृक्षांच्या फांद्यांचा आणि बुंद्याचा काहीही उपयोग होत नाही. विदेशी वृक्षांमुळे रातकिडे, वटवाघूळ, घारी, गिधाडे, चिमण्या कावळे, घुबड, कबुतरे, पोपट यासारखी सरास् दिसणारे पक्षी दिसेनासे झाली आहेत. एकंदरीत अशा विदेशी वृक्षांमुळे होणाऱ्या परागकण प्रक्रियेला आणि पक्षांद्वारे होणाऱ्या बिजप्रसाराच्या कामाला खीळ बसत असून कीटक, किडे, पक्षी जोडणारी निसर्गाची अन्न साखळी कुमकुवत होत आहे. देशी वृक्ष आपल्या जंगलात किंवा परिसरात पर्यावरणाचा समतोल साधत असतात. त्यांच्या आस्तित्वशी जुळवून घेतलेली, त्यावर जोपासली जाणारी सजीव व्यवस्था असते. या सजीव अवस्थेत मनुष्य, पशुपक्षी, कीटक सामावले असतात. देशी वृक्षांमुळे पक्षांना कीटकांना, किड्यांनाही निवारा मिळतो. विघटन झालेल्या पालापाचोळ्याच्या खतातून निर्माण होणारी पोषकद्रव्ये पुन्हा वृक्षाकडे पाठवण्याचे काम वृक्षांची दूरवर पसरलेली मुळे करत असतानाच जमिनीत खोलवर जाऊन ती जमिनीवरच्या मातीला धरून ठेवतात. विविध कीटकांना, किड्यांना आणि सरपटणाऱ्या जीवांना अशी जमीन उपयुक्त ठरते आणि एक परिपूर्ण पर्यावरण निर्माण होते. विदेशी वृक्ष पुरेसा ऑक्सीजनही देत नाहीत. देशी वृक्ष जितका ऑक्सीजन देतात तितका ऑक्सीजन विदेशी वृक्ष देत नाहीत. काही देशी वृक्ष तर चोवीस तास ऑक्सीजन देतात. वातावरणातील ऑक्सीजन कमी होऊ द्यायचा नसेल तर देशी वृक्षांचीच लागवड करावी. वड, पिंपळ, कडुनिंब, आवळा, चिंच, फणस, आंबा, बेल, कदंब, पळस या वृक्षांची जास्तीतजास्त लागवड करण्यात यावी. देशी वृक्ष औषधी असतात शिवाय हे वृक्ष मोठे झाल्यास त्याची दाट व थंडगार सावलीही मिळते त्यामुळे जास्तीतजास्त देशी वृक्षांची लागवड करायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### नेक माणसे व खोटी माणसे

नेक माणसे कधीच खोटे बोलत नाहीत
खोटी माणसे कधीच नेक वागत नाहीत
नेक माणसे व्यवहाराला करेक्ट असतात
गरीब माणसांना फसवून लुटत नसतात
नेक माणसे वचनाला ठाम असतात
वचन देऊन विश्वासघात करत नसतात
खोटी माणसे शब्दाला जागत नाहीत
विश्वासघात करून कबूल होत नाहीत
प्रामाणिक माणसे चारित्र्यवान असतात
आपल्या शिलाला प्राणपणाने जपतात
खोट्या माणसांपासून लांब राहतात
खोटी माणसे त्यांना बदनाम करतात
नेक माणसांचा सुळसुळाट कमी झालाय
खोट्या माणसांचा सुळसुळाट वाढलाय
प्रामाणिक माणसांना खूप त्रास होत आहे
खोट्या माणसांना याचा आनंद होत आहे
प्रत्येक क्षेत्रात खोटी माणसे वाढली आहेत
सज्जन माणसे यांच्यापासून दुरावली आहेत
सज्जन माणसाला यांचा होत आहे त्रास
खोट्यांना मोठे असल्याचा होतोय भास
नेक माणसे राहायला नियमबद्ध असतात
वागायला खोट्यांपेक्षा उजवे असतात
नेक माणसांना चोरी करायला नको वाटते
खोट्या लोकांना चोरी करायला आवडते
खोटी माणसे खोटे बोलायला असतात पटाईत
नेक माणसांना नाहक आणतात अडचणीत
खोटी माणसे खोटी असतात पण बोलतात रेटून
बांधवांनो खोट्या लोकांना राहू नका खेटून

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर, मो.७४९८७१५६६१**

# माध्यम भूषण राजेंद्र घरत

योग्य व्यक्तीला योग्य पुरस्कार मिळाला की,आपल्याला साहजिकच आनंद होतो. तसाच आनंद मला झाला,जेव्हा मला हे कळाले की, शिवतुतारी प्रतिष्ठानचा तिसरा जीवनगौरव पुरस्कार मित्रवर्य,राजेंद्र घरत यांना मिळाला तेव्हा आणि झरझर माझ्या डोळ्यांपुढे त्यांचा जीवन प्रवास दिसू लागला.

मी २६ जून १९९८ रोजी कोकण विभागीय माहिती उपसंचालक म्हणून कोकण भवनात रुजू झालो.काही दिवसातच राजेंद्र घरत यांची आणि माझी ओळख झाली. कळत नकळत या कामापुरत्या झालेल्या ओळखीचे रूपांतर स्नेहपूर्ण संबंधात बदलत गेले आणि ते वृद्धिंगत होत गेले,ते आजतागायात ! राजेंद्र घरत यांच्या पत्रकारितेला ३० वर्षे पूर्ण झाली आहेत.या ३० वर्षांपैकी मी त्यांच्या २७ वर्षांच्या पत्रकारितेचा साक्षीदार, साथीदार राहिलो आहे. आतापर्यंत तुम्ही किती लेख, बातम्या लिहिल्या असतील ? असे घरत साहेबांना विचारल्यावर त्यांनी सांगितलेल्या आकडेवारीने मी अचंभित झालो ! दै.लोकसत्ता, दै, महाराष्ट्र टाईम्स, दै.सकाळ, दै. पुण्यनगरी, दै. गांवकरी, दै. ठाणे वैभव,नवी मुंबईतील साप्ताहिके, मुंबई, नवी मुंबईतील दिवाळी अंक यांमधून त्यांनी विपुल लेखन केले आहे.त्याशिवाय त्यांनी १५०० हून अधिक मुलाखती घेतल्या आहेत. नवी मुंबईतील नवे शहर मधून मुशाफिरी हे साप्ताहिक सदर नोव्हेंबर १९९९ पासून अखंडपणे आजतागायत अखंडपणे सुरू आहे. स्वतःचे वार्तादीप हे साप्ताहिकही २००५ ते २०१९ दरम्यान चालवले आहे.

एखादी व्यक्ती मोठी पत्रकार झाली की,ती सहसा वाचकांची पत्रे या सदरासाठी काही लिहित नाही. पण घरत साहेबांचा मोठेपणा असा की,ते अजूनही वाचकांची पत्रे या सदरासाठी पत्राद्वारे काही ना काही समस्यांना वाचा फोडण्याचे काम करीत असतात. घरत साहेब ऑगस्ट २०१९ पासून दै. आपलं नवे शहर या वर्तमानपत्रात उपसंपादक म्हणून काम करीत आहेत.या बरोबरच त्यांनी या वर्तमानपत्राच्या युट्युब वाहिनीसाठी ३२५ हुन अधिक नामवंत -गुणवंत व्यतींच्या मुलाखती घेतल्या आहेत.

पत्रकारितेबरोबरच घरत साहेब अंधश्रध्दा निर्मुलन, सर्पमैत्री,वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन,व्यसनमुक्ती, अंधशाळा, अनाथ मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या संस्था अशांना मदत करण्यासाठी सक्रिय सहभाग घेत असतात. त्यांच्यामुळे,त्यांच्याबरोबर मलाही काही उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यातील एक अविस्मरणीय आठवण म्हणजे, कोकणातील दृष्टिहीन मुले आणि मुलींची पहिली निवासी शाळा असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील घराडी येथील स्नेहज्योती संस्थेला दिलेली भेट होय.दिवसभर त्या मुलांच्या सहवासात राहून माझे



डोळे चांगलेच उघडले! या भेटीला जोडूनच आम्ही तिथून जवळच असलेल्या आंबावडे या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावाला, तेथील स्मारकाला भेट देऊ शकलो. सामाजिक जाणिवेचे वकील योगेश मोरे साहेब हे ही आमच्यासोबत होते.खरोखरच एक अविस्मरणीय अशी ती भेट ठरली.

पत्रकारिता करीत असतानाच घरत साहेब प्रकाशन व्यवसायातही सक्रीय आहेत. माझे पहिलेवहिले भावलेली व्यक्तिमत्वे हे पुस्तक त्यांच्या सृजन प्रकाशन संस्थेतर्फेच प्रसिद्ध झाले आहे.अशा इतर पुस्तकांशिवाय त्यांनी अंध मुलांसाठी ब्रेल लिपीमध्ये २८ पुस्तके प्रकाशित केली .तर ६ पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.ब्रेल लिपीतील पुस्तकांसंदर्भातील त्यांचे काम पाहुन आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीने त्यांची मुलाखत प्रक्षेपित केली आहे.

विविध गुणीजनांच्या घेतलेल्या मुलाखतींवर आधारित असलेल्या त्यांच्या 'अनोखी व्यक्तीमत्व' या पुस्तकाचे प्रकाशन तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते सह्याद्री अतिथी गृहात संपन्न झाले होते.

नवी मुंबई महानगरपालिकेची महापौर गणेश दर्शन स्पर्धा, लोकसत्ता गणेश दर्शन स्पर्धा, डॉ डी वाय पाटील महाविद्यालयाची वक्तृत्व स्पर्धा, मराठी भाषा संवर्धन दिन या निमित्त आयोजित स्पर्धांचा परीक्षक म्हणूनही घरत साहेबांनी काम पाहिले आहे.

घरत साहेबांना आतापर्यंत तंबाखू विरोधी घोषवाक्य स्पर्धा,व्यसनमुक्तीपर घोषवाक्य स्पर्धा, स्तंभलेख स्पर्धा यात अनेक पारितोषिकेही प्राप्त झाली आहेत.याशिवाय मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ, आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे या व अशा विविध संस्थांकडून विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

मुंबई विद्यापीठातून बी.ए.(मानसशास्त्र) ,एम.ए.(मराठी साहित्य) या पदव्या संपादन केलेल्या घरत साहेबांनी पत्रकारितेत येण्यापूर्वी लंडन पिल्सनर या बिअर कंपनीत काही वर्षे काम केले आहे.पण

त्यांचे करावे तितके कौतुक कमीच ठरेल,ते यासाठी की खुद्द बिअर कंपनीत काम करताना आणि नंतरही आजतागायत ते बिअर,दारू, धूम्रपान,तंबाखू अशा सर्व प्रकाराच्या व्यसनांपासून निर्धारपूर्वक दूर राहिलेले आहेत. घरत साहेबांना त्यांच्या सर्व प्रकारच्या कार्यामध्ये, उपक्रमांमध्ये घरून पूर्ण साथ मिळत आली आहे.समाजाच्या

कल्याणासाठी आपली वाणी, लेखणी,शक्ती झिजविणाऱ्या घरत साहेबांना दीर्घायुष्य लाभो ,या हार्दिक शुभेच्छा.

**देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००**

# शेतकरी कुटुंबातून उभं राहिलेलं नेतृत्त्व; बबनराव लोणीकर

आमदार बबनराव लोणीकर साहेब यांच्या ताज्या पत्रकार परिषदेतील स्पष्ट आणि प्रांजल खुलाशाने त्यांच्या शेतकरीप्रेमी, समाजहितकारी आणि प्रामाणिक नेतृत्वाचा ठसा पुन्हा एकदा ठळकपणे उमटला आहे. मराठवाड्याच्या रखरखीत मातीत जन्मलेला हा माणूस, ज्याने आपल्या ४० वर्षांच्या अथक राजकीय आणि सामाजिक कारकीर्दीत शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी, सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी आणि मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला झोकून दिलं, त्यांच्या शब्दांतून त्यांच्या निष्ठेची आणि कळकळीची प्रचिती येते. त्यांनी आपल्या भाषणातील बाप या शब्दाचा संदर्भ आणि त्यामागील हेतू याचा सविस्तर खुलासा करत विरोधकांच्या खोट्या प्रचाराचा आणि तथ्यहीन आरोपांचा पर्दाफाश केला. हा खुलासा केवळ त्यांच्या स्वच्छ चारित्र्याचाच नव्हे, तर मराठवाड्याच्या मातीत रुजलेल्या त्यांच्या अटल समाजसेवेचा द्योतक आहे.

**शेतकरी कुटुंबातून उभं राहिलेलं नेतृत्व**

आमदार बबनराव लोणीकर साहेबांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. मातीशी नाळ जोडलेल्या या नेत्याला शेतकऱ्यांचे दुःख, त्यांच्या कष्टमय जीवनातील आव्हाने आणि त्यांच्या आकांक्षा याची जन्मजात जाण आहे. गारपीट, दुष्काळ, आणि अवकाळी पावसाने हतबल झालेल्या शेतकऱ्यांच्या बाजूने त्यांनी सातत्याने लढा उभारला. हजारो शेतकऱ्यांचे मोर्चे काढून, शासनाच्या दारात ठाण मांडून, आणि विधिमंडळात शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून त्यांनी शेतकऱ्यांना आधार दिला. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा सर्वप्रथम मांडणारे लोणीकर साहेबच होते, ज्यामुळे त्यांची शेतकरीप्रती असलेली अढळ निष्ठा आणि बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध झाली. अशा परिस्थितीत त्यांच्यावर शेतकरीविरोधी बोलल्याचा आरोप करणं हा केवळ राजकीय स्वार्थ आणि खालच्या पातळीचा डावपेच आहे, जो जनता सहज ओळखेल.

**बाप शब्दाचा खरा संदर्भ आणि विरोधकांचा गैरप्रचार**

लोणीकर साहेबांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं की, बाप हा शब्द मराठवाड्याच्या ग्रामीण बोलीभाषेत सर्वसामान्य आणि प्रचलित आहे. हा शब्द त्यांनी शेतकऱ्यांविरुद्ध नव्हे, तर मूठभर पेड सोशल मीडियाद्वारे ट्रोलिंग करणाऱ्या व्यक्तींसाठी वापरला, जे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्वतः लोणीकर साहेब यांच्याविरुद्ध तथ्यहीन आणि निरर्थक प्रचार करतात. या व्यक्ती शासनाच्या योजनांचा लाभ घेतात-जसे की किसान सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना -पण तरीही विरोधी पक्षांच्या सांगण्यावरून सरकारविरोधी खोटा प्रचार करतात. वाटूर येथील सभेत लोणीकर साहेबांनी याच टोळक्याच्या निष्क्रिय आणि विध्वंसक वृत्तीवर भाष्य करताना आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. मात्र, विरोधकांनी त्यांच्या या शब्दांचा चुकीचा अर्थ लावून आणि संदर्भ तोडून मीडियात विपर्यास केला. लोणीकर साहेबांनी ठामपणे सांगितलं की, मी शेतकरीविरोधी कधी बोललो नाही आणि भविष्यातही बोलणार नाही. त्यांच्या या स्पष्टवक्तेपणाने आणि प्रामाणिक खुलाशाने विरोधकांचा खोटा प्रचार उघडा पडला आहे.

**नम्रता आणि समाजाप्रती कळकळ**

लोणीकर साहेबांनी आपल्या खुलाशात नम्रतेचा आणि समाजाप्रती असलेल्या कळकळीचा परिचय दिला. त्यांनी सांगितलं की, जर त्यांच्या बोलण्याने कोणाच्या भावना दुखावल्या असतील, तर ते हजार वेळा माफी मागायला तयार आहेत. ही नम्रता आणि जनतेशी असलेलं थेट नातं त्यांच्या नेतृत्वाचं वैशिष्ट्य आहे. सत्तेत असताना आणि सत्तेबाहेर असतानाही त्यांनी शेतकऱ्यांचे आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सातत्याने मांडले. त्यांचं संपूर्ण भाषण ऐकल्यास त्यांचा हेतू स्पष्ट होतो-ग्रामीण भागातील तरुणांनी निष्क्रियता, व्यसनाधीनता आणि खोट्या प्रचारापासून दूर राहून कष्ट, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीने समाजाच्या आणि स्वतःच्या विकासात योगदान द्यावं. हा संदेश समाज जागृतीचा आणि तरुण पिढीला प्रेरणा देणारा आहे.

**अतुलनीय योगदानः मराठवाड्याचा आधारस्तंभ**

आमदार बबनराव लोणीकर साहेबांचं मराठवाड्याच्या विकासातील योगदान अतुलनीय आहे. त्यांनी मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेतून १७६ गावांना शुद्ध पाणी मिळवून दिलं, ज्यामुळे पाणीटंचाईच्या जखमेवर मलम लावलं गेलं. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एक कोटी स्वच्छतागृहं बांधून ग्रामीण भागातील बायका-मुलींना सन्मान आणि आरोग्य दिलं. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि शेगाव-पंढरपूर दिंडी महामार्ग यामुळे गावं शहरांशी जोडली गेली, ज्याने व्यापार आणि धार्मिक पर्यटनाला चालना मिळाली. जायकवाडी धरणाचं** पाणी आणि शेततळ्यांद्वारे एक लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, रमाई आवास योजना, आणि पंतप्रधान आवास योजना यामुळे ५०,००० बेघरांना हक्काचं घर मिळालं. शिक्षण, आरोग्य, आणि सामाजिक कल्याण योजनांद्वारे त्यांनी मराठवाड्याचं जीवनमान उंचावलं.

**भ्रष्टाचाराविरुद्धचा अटल लढा**

लोणीकर साहेबांचं नेतृत्व केवळ विकासापुरतं मर्यादित नाही, तर ते भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्याचंही प्रतीक आहे. जालना जिल्ह्यातील अनुदान घोटाळ्याचा पर्दाफाश करून त्यांनी खऱ्या अर्थाने जनतेच्या हक्कांसाठी आवाज उठवला. या घोटाळ्यात बोगस शेतकऱ्यांना अनुदान, दुबार नावाने वाटप, आणि गैरमार्गाने रक्कम लाटण्याचे प्रकार उघडकीस आले. लोणीकर साहेबांनी दोषी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आणि कृषी सहाय्यकांवर कठोर कारवाईची मागणी केली. त्यांनी ठामपणे सांगितलं की, जोपर्यंत संपूर्ण रक्कम वसूल होत नाही, तोपर्यंत माझा लढा सुरू राहील. विधिमंडळात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना आणि अवचित मुद्द्यांद्वारे हा विषय उचलण्याचा त्यांचा निर्धार जनतेच्या हिताप्रती त्यांच्या अटल बांधिलकीचं द्योतक आहे.

**सामाजिक समरसतेचा आदर्श**

लोणीकर साहेबांचं नेतृत्व जाती-धर्माच्या भिंती तोडणारं आणि सामाजिक समरसता वाढवणारं आहे. धनगर, दलित, मराठा, बंजारा, मातंग, बौद्ध, माळी, वंजारी, आणि अल्पसंख्याक समाजाला त्यांनी एकत्र आणलं. प्रत्येक गावात, तांड्यावर, आणि वस्तीवर त्यांनी वैयक्तिक नातं जोडलं. लाडकी बहीण योजना, दिव्यांग आणि वृद्धांसाठी मासिक मानधन, आणि सामाजिक कल्याणाच्या योजनांद्वारे त्यांनी सर्व स्तरांतील लोकांना आधार दिला. त्यांचा हसतमुख स्वभाव, सडेतोड बोलणं, आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची वृत्ती यामुळे ते जनतेच्या हृदयात कायम स्थान मिळवतात.

**मराठवाड्याच्या आशेचा किरण**

स्व. गोपीनाथराव मुंडे आणि स्व. विलासराव देशमुख यांच्या अनुपस्थितीत मराठवाड्याला नेतृत्वाची पोकळी जाणवते. ही पोकळी भरून काढण्याची क्षमता लोणीकर साहेबांमध्ये आहे. मराठवाड्याच्या सिंचन, शिक्षण, बेरोजगारी, आणि औद्योगिक विकासासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. जनता आणि कार्यकर्त्यांना विश्वास आहे की, मंत्रिमंडळात संधी मिळाल्यास ते मराठवाड्याला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेऊ शकतील. त्यांनी पक्षाच्या बैठकीत सांगितलं, पाहुणे येतात आणि जातात, पण निष्ठावंतच पक्षाचा खरा पाया असतात. या शब्दांनी कार्यकर्त्यांमध्ये नवस्फुरती निर्माण झाली.

**जनतेच्या हृदयातील नेते**

आमदार बबनराव लोणीकर साहेब हे मराठवाड्याच्या मातीत रुजलेलं वटवृक्ष आहेत. त्यांच्या शेतकरीप्रेमी, समाजहितकारी आणि भ्रष्टाचारविरोधी कार्याने लाखो जीवन सुसंपन्न झालं आहे. विरोधकांचा खोटा प्रचार आणि तथ्यहीन आरोप त्यांच्या स्वच्छ प्रतिमेला डाग लावू शकत नाहीत. त्यांच्या पत्रकार परिषदेतील खुलाशाने त्यांचा समाज जागृतीचा आणि तरुणांना प्रेरणा देणारा हेतू स्पष्ट झाला आहे. जनता जनार्दन सत्याच्या बाजूने आहे, आणि लोणीकर साहेबांचं प्रामाणिक नेतृत्व तिच्या हृदयात कायम आहे. मी त्यांच्या शेतकरीप्रेमी, समाजहितकारी आणि प्रामाणिक कार्याला, तसेच त्यांच्या स्पष्ट खुलाशाला १००% पाठिंबा देतो. त्यांचं संपूर्ण भाषण आणि खुलासा विचारात घेऊन जनतेने सत्य स्वीकारावं. लोणीकर साहेबांच्या कार्याला आणि त्यांच्या अटल लढ्याला माझा मनापासून सलाम! मराठवाड्याचं भविष्य उज्ज्वल करणारा हा नेता पुढेही असाच प्रेरणा देत राहील, आणि त्यांच्या या प्रवासात जनता नेहमीच त्यांच्या सोबत असेल!

**- बाबा आटोळे**

पान १ वरुन

### खासदार डॉ. ...

माथी जबरदस्तीने नको असलेले खते व औषधे मारली जातात. याबाबत सविस्तर आढावा घेऊन अधिकारी व खत कंपन्यांच्या प्रतिनिधींना सूचना केल्या. नवीन e-pos मशिन उपलब्ध करून देण्या बाबत सुचना केल्या जिल्ह्यात १०८५ अधीकृत परवाना धारक आहेत खत कंपन्यांना व जिल्हा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत सुसुत्रता येण्याबाबत सक्तीच्या सुचना केल्या. जालना जिल्ह्याची खताची मागणी एप्रिल २०२५ ते जुन २०२५ पर्यंत पुढील प्रमाणे आहे. युरिया मागणी २९५३४ मेट्रिक टन, पुरवठा २२४१८ मेट्रिक टन एकूण ७११६ मेट्रिक टन युरिया पुरवठा कमी आहे. तसेच डीएपी मागणी १३८८३ मेट्रिक टन, पुरवठा ८१७७ मेट्रिक टन एकूण ५७०६ मेट्रिक टन डीएपी पुरवठा कमी आहे. एमओपी मागणी १२३९ मेट्रिक टन, पुरवठा ५९३ मेट्रिक टन एकूण ६४६ मेट्रिक टन पुरवठा कमी तसेच एसएसपी मागणी १६०१६ मेट्रिक टन, पुरवठा १२५३३ मेट्रिक टन एकूण ३४८३ मेट्रिक टन पुरवठा कमी. खत कंपन्यांनी फक्त एनपीके चा पुरवठा मागणीपेक्षा जास्त केलेला आहे. या गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना वेळेवर व मुबलक खत उपलब्ध होण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना सजग होऊन योग्य नियोजन करून शेतकऱ्यांच्या प्रति असलेले दायित्व पूर्ण क्षमतेने निभावण्याचे निर्देश देण्यात आले.

या वेळी फर्टीलायजर ब्लॉक या मोबाईल अँप चे उद्घाटन खा.डॉ.कल्याण काळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले या अँप मुळे शेतकऱ्यांना कोणत्या दुकानात किती व कोणते खत उपलब आहे याची माहिती, खत विक्रेत्याचा मोबाईल नंबर उपलब्ध होणार आहे तसेच जिल्ह्यातील खताबाबत सर्व माहिती या अँप मुळे पारदर्शक होईल अशी आशा खा.डॉ.कल्याण काळे यांनी व्यक्त केली.

या वेळी अप्पर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, जिल्हा कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे, जिल्हा परिषदेचे प्र.कृषी अधिकारी पी.बी.बनसावडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, जि.प.जालना मा.कृषी सभापती रामधन कळंबे, जि.प. जालना चे मा. सभापती भानुदासराव घुगे नाना, जालना पं.स. चे माजी उपसभापती सोपानराव तिरुखे, श्री राम सिरसाठ, सुभाष मगरे, देवजीनाना जऱ्हाड, ज्ञानेश्वर शिंदे, विजय जऱ्हाड, अजय बनकर शेतकरी संघटनेचे सुरेशराव काळे, दत्तात्रय कदम, नारायणराव वाढेकर, अरुण पैठणे संबंधित सर्व विभागाचे अधिकारी, खत कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### कत्तलीसाठी डांबुन ...

देऊळगावराजा रोड जालना या गोशाळेत ठेवण्यात आलेले आहे व इसम नामे शकिल बासेद कुरेशी वय ६० वर्षे, रा. कुरेशी मोहल्ला जुना जालना याचेविरुध्द पोलीस स्टेशन कदिम जालना येथे प्राणी संरक्षण कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोलीस निरीक्षक माने, पोलीस उप निरीक्षक मोरे पोलीस स्टेशन कदिम जालना स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि योगेश उबाळे, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, जगदिश बावने, दिपक घुगे, गोपाल गोशीक, कैलास खार्डे, विजय डिक्कर, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, संदिप चिंचोले, इर्शाद पटेल, किशोर पुंगळे, योगेश सहाने सर्व स्थागुशा जालना व पोलीस स्टेशन कदिम जालना येथील अंमलदार राठोड, भाले, बाबा गायकवाड, किरन चेके, शेख, अन्सारी, व गायकवाड सर्व नेमणुक पोलीस स्टेशन कदिम जालना यांनी केली आहे.



**सामाजिक न्याय दिनाच्या औचित्यावर समाजभानच्या माध्यमातून शैक्षणिक पालकत्व घेण्यात आलेल्या जालना तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबातील मुले, एक पालकत्व असणाऱ्या मुलांना माजी मंत्री तथा आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य सुपूर्द करण्यात आले. भविष्यातही या मुलांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी मदत करण्याचा शब्द यावेळी खोतकर साहेबांनी दिला. यावर्षी मराठवाड्यातील ६00 आत्महत्याग्रस्त शेतकरी, आर्थिक दुर्बल घटकातील मुले, १00 भंगारवेचक कुटुंबातील मुलांचे शैक्षणिक पालकत्व समाजभानकडून घेण्यात आले असून १२ मुलांना निवासी शिक्षणासाठी हॉस्टेलची सोय करण्यात आली आहे. तसेच NEET व JEE च्या माध्यमातून गुणवत्तेत आलेल्या विद्यार्थ्यांनाही आर्थिक मदत करण्यात येणार आहे. समाजभानच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या शैक्षणीक पालकत्व मोहिमेची माहिती यावेळी खोतकर साहेबानी जाणून घेत या कामासाठी शाबासकीची थाप देत शुभेच्छा दिल्या. यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, डॉ सेलचे डॉ उमेश जाधव, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णु पाचपुले, गजानन राठोड, दीपक खोजे, आकाश चापकानडे, खुपकर, विष्णू पवार, राम खाडे उपस्थित होते.**

# परतूर तालुका कामगार सेनेच्या संघटकपदी आनंद वाकळे यांची नियुक्ती



**परतूर ।प्रतिनिधी -** परतूर येथील आनंद वाकळे यांची तालुका कामगार सेनेच्या संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख ए.जे.बोराडे यांनी एका पत्रकाव्दारे नियुक्ती केली आहे.त्यांना दिलेल्या नियुक्ती पत्रकात म्हंटले आहे की शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने सचीव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर तालुक्यात संघटनात्मक काम वाढविण्याच्या दृष्टीने घराघरात शिवसेनेचा विचार निर्माण करण्याच्या उद्देशाने येथील आनंद वाकळे यांची परतूर तालुका कामगार सेनेच्या संघटकपदी नियुक्ती करण्यात येत आहे.यावेळी शिवसेनेचे नेते सुदर्शन सोळंके,मा. सभापती संतोष वरकड,विजय ठोंबरे,मारोती धुमाळ,रमेशराव आकात,शेख उस्मान,विलासराव लिपने,सचिन डवले,गोरखनाथ वटाणे,प्रदिप ठोके,किरण कितारे,प्रदिप धुमाळ, गोपाल सागडे आदी उपस्थित होते.



**प्रा.बबन सोपान पवार यांची शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय अंबड या ठिकाणी प्राचार्यपदी पदोन्नती मिळाल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित गणेश चव्हाण, गुलाब राठोड, डॉ. सोपान चव्हाण, ॲड. सुभाष राठोड, विनायक राठोड, उत्तम राठोड, संजय पवार, शाम राठोड, योगीराज जाधव, अर्जुन पवार आदी उपस्थित होते.**

## युती होण्याआधी मनोमिलन सुरू

**मुंबई -** महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने ठाकरे बंधू राजकीयदृष्ट्या एकत्र येणार असल्याची चर्चा असताना आता दोन्ही नेत्यांमधील पदाधिकाऱ्यांचे मनोमिलन होत असल्याचे दिसत आहे. ५ जुलै रोजी हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात निघणाऱ्या मोर्चात ठाकरे बंधू एकत्र येतील, असे सुतोवाच शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी केले आहे.

# राजर्षी शाहू महाराज हे कर्ते सुधारक होते - प्रा.बी.बी चव्हाण




**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मूल्य शिक्षण व सांस्कृतिक समितीच्या वतीने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख हे होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.बी.बी.चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले, उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख वक्ते प्रा.बी.बी. चव्हाण यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर चौफेर विचार मांडतांना शाहू महाराज हे फक्त बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते असे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांची कोल्हापूर संस्थानाची गादी सांभाळतांना शाहू महाराजांनी अनेक जनकल्याणकारी योजना राबवल्या. मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या ,शेती व्यवसायाला चालना मिळावी म्हणून बंधारे बांधले,राधानगरी धरणाची निर्मिती केली,कुस्तीला चालना दिली ,याशिवाय समाजातील स्पृश्य-अस्पृश्य भेद मिटवतांना त्यांनी अनेकांना रोजगार दिले व एक सामाजिक न्यायाचा पुरस्कर्ता राजा म्हणून उदयास आले ,म्हणून महाराष्ट्र शासनाने छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्याचे ठरविले व आज दिनांक २६ जून हा दिवस छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी केली जाते. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर सखोल प्रकाश टाकताना म्हणाले की, छत्रपती शाहू महाराज यांच्या समकालीन राजवटीमध्ये अनेक राजे वेगवेगळ्या संस्थानांमध्ये राज्यकारभार पाहत होते पण त्यांची सामाजिक न्यायाची भूमिका ही विसंगत होती ,छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानिकांमध्ये मुला,मुलींना प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे केले जे पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवणार नाहीत त्यांना मासिक एक रुपया दंड ही ठोठाविला त्यासाठी शाळांची,वस्तीगृहांची निर्मिती केली त्यामुळे गोरगरिबांची मुले शाळेत शिकू लागली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.एम. पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन मूल्य व सांस्कृतिक समिती प्रमुख डॉ. एस.एस पहारे यांनी मानले या कार्यक्रमास महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भारतीय जैन महिला संघटनेतर्फे वृक्षारोपण

जालना/प्रतिनिधी - भारतीय जैन महिला संघटनेतर्फे पेड़ लगाना एक सत्कर्म है, जो जीवन को पवित्र बनता है या पावन विचारांना साकार करत प. पू. गुरुदेव श्री १०८ श्री विरागसागरजी महामुनिराज यांच्या प्रथम समाधी दिनानिमित्त प. पू. उपाध्याय विरंजनसागरजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात जालना येथील विराग अक्षय समाधी तीर्थ देवमूर्ती परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

जैन समाजाच्या विविध मंदिरांतील विश्वस्त मंडळी व समाजबांधवांच्या उपस्थितीत हा पर्यावरणपूरक उपक्रम घेण्यात आला. जिल्हाध्यक्ष सौ. सरिता कुचेरिया यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्षा सौ. रूही कासलीवाल, सौ. रश्मी पहाडे, सौ. मिनल सावजी, सौ. मनीषा सावजी, सौ. लवीना जैन, सौ. अर्पिता पाटनी यांच्यासह अनेक महिला सदस्यांच्या हस्ते विविध प्रकारची रोपे लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक योगेश कासलीवाल यांनी विशेष परिश्रम घेतले. या वृक्षारोपण उपक्रमाद्वारे समाधी दिनाचे औचित्य साधत पर्यावरण रक्षणाचा अनोखा संदेश देण्यात आला. दरवर्षी समाजाच्या प्रमुख धार्मिक उत्सवांनिमित्त वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबविण्याचा संकल्प उपस्थित महिलांनी केला.

# शेतकऱ्याला प्रतिष्ठा कधी/कशी मिळणार?

महाराष्ट्रात १ जुलै हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे जनक, वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनाचे स्मरण कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.

या दिवशी, राज्यातील शेतकऱ्यांच्या कार्याचा गौरव केला जातो आणि कृषी क्षेत्रातील समस्यांवर चर्चा केली जाते. कृषी दिन शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे.सन्मान तर राहिला बाजूला, पदोपदी अपमान, उपेक्षा सहन करावी लागते आहे.

या दिवशी कृषी क्षेत्रातील समस्या आणि संधींवर चर्चा करून विकासाच्या योजनांवर भर दिला जातो.

पण आज शेतकऱ्यांची परिस्थिती बघितली तर जवळपास साठ ते सत्तर टक्के शेतकरी हा अल्प अत्यल्प भूधारक आणि कोरडवाहू शेती करणारा आहे. चांगला पाऊस झाला पिक चांगली आलीत, तरीपण उत्पादनखर्च वजा जाता घर खर्च भागवण्या करिता त्याला कर्जाशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे शेतकरी सतत आणि सतत कष्ट करीत असतो. आणि त्याशिवाय त्याला काही पर्याय नसतो. कुठल्याही प्रकारची चैन नाही, आनंद नाही , समाजात प्रतिष्ठा नाही. ना त्याच्या शेतीला प्रतिष्ठा ना त्याला प्रतिष्ठा. त्यामुळेच आता बहुतांशी नवीन पिढी शेती करण्यापासून परावृत्त होत आहेत. असा हा आपला बळीराजा सतत कुठल्या ना कुठल्या विवंचनेत असतो. चेहऱ्यावर आनंद नाही,. का कुठली अपेक्षा नाही. परिस्थितीने अतिशय शांत होऊन गेलेला आणि चेहऱ्यावर कष्टाच्या खुणा जाणवतात.

शेतकरी हा सुद्धा समाजाचा भाग आहे त्याला पण काही करावेसे वाटते पण परिस्थिती ने गांजल्या मुळे तो काही करू शकत नाही. फक्त आपल्यासमोर जी परिस्थिती आहे ती उघड्या डोळ्याने तो पाहत असतो आणि आतल्या आत धुमसत असतो. कुटुंबात मुल, मुली असतात. त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न असतो. काही शिक्षित असतात काही उच्च शिक्षण घेतले असतात. त्यांना काही वेगळे करावेसे वाटते. नोकरीच्या शोधात असतात. पण नोकरी मिळत नाही म्हणून तेही हतबल असतात. समोरच्या परिस्थितीशी ते एकरूप होऊ शकत नाही. आपल्या शेतीची अवस्था पाहून वडिलधाऱ्या मंडळीचे काय हाल होत आहेत ते बघत असतात, आणि आपल्याला याच्या व्यतिरिक्त काही करता येईल का याचाही ते शोध घेत असतात परंतु. त्यांना तसे काही साध्य होत नसते. आता शेतीत काम करण्याची त्यांची इच्छाही नसते. आणि क्षमताही राहीली नसते. त्यांना शहरी आकर्षण वाटत असते. शेतात कष्ट करण्यापेक्षा शहरात जाऊन काहीतरी थोडाफार छोटा मोठा का होईना काहीतरी व्यवसाय करावा किंवा नोकरी पहावी याकडे कल झालेला आहे. थोडक्यात, आता शेतीत काम करणे कष्ट करणे हे त्यांना कमीपणाचे लक्षण वाटते आहे. आणि म्हणूनच वडीलधारी मंडळी शेतीला चिकटून असली तरी पण त्यांना कुटुंबातील मुलांची साथ मिळेल ही शक्यता नाही.

शहरातील रहाणीमान त्यांना आकर्षित करून घेत आहे.

अशा अल्प अत्यल्प तसेच कोरडवाहू शेती करणाऱ्या कुटुंबात मुला मुलीच्या लग्नाचे प्रश्न गंभीर होत आहेत. शेतीला आणि शेतकऱ्याला प्रतिष्ठा नसल्याने निव्वळ शेती असणाऱ्या घरात कोणीही आपल्या मुली द्यायला तयार होतं नाही. तर शेतीच्या उत्पन्नातून संसार, घर खर्च,शिक्षणाचा खर्च ही निघत नसल्याने मुलीच्या लग्नात देण्याघेण्याचा हुंडा विवाहाचा खर्च झेपत नसल्याचा प्रश्न उपस्थित होतो . मुलीचे लग्न ही रखडल्यामुळे अनेक कुटुंबात तरुण मुला मुलींनी आपले जीवन संपवले आहे. शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नाचे विषय खूपच गंभीर झाले आहेत.

त्यातच कर्जाचा बोजा थकलेले कर्ज आणि कर्ज वसुली चा रेटा यामुळे शेतकरी अधिकच विचित्र परिस्थितीत सापडतो.

शेतकऱ्यांविषयी अनेक वादग्रस्त आणि शेतकऱ्यांचा अवमान करणारी विधाने केली जातात.

शेतकरी कर्जमाफीची रक्कम साखरपुडा,लग्नासाठी खर्च करतो. त्यातील एक रुपया तरी शेतीला लावतो का ?असे




वक्तव्य कृषी मंत्र्यांनी केले होते. आता भिकारी ही एक रुपया घेत नाही आम्ही एक रुपयात पिक विमा घेतो असेही वक्तव्य केले होते. आता भिकारी आणि शेतकरी हे वक्तव्य काय आहे? काहीतरी असंबद्ध प्रकारचे वक्तव्य आहे.अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची कृषी मंत्री कोकाटे यांनी पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलत असतानाच त्यांनी हे वक्तव्य केले. मंत्री, कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय होणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? जे नियमात बसेल त्याप्रमाणे करा पण किमान शेतकऱ्यांना डिवचवू नका आणि अपमान कारक बोलू नका. त्याच्याविषयी सवेदनशीलता असू द्या. शेतकऱ्यांशी बोलताना त्रासिक पणे बोलू नका. या आधी सुध्दा एका राजकीय नेत्याने कितीही दिले तरी रडतात साले असे शेतकऱ्यांनचा अवमान करणारे वक्तव्य केले होते. कोणी आपल्या खिशातून काढून देत नाही.

अशातच पुन्हा एकदा बबनराव लोणीकर यांनी वादग्रस्त विधान केल्याने चर्चेत आले आहेत. यावेळी लोणीकरांची सरकारवर टीका करणाऱ्या तरुणांवर निशाणा साधताना जीभ घसरली आहे. तुझ्या अंगावरचे कपडे आणि पायातली चप्पल सुद्धा सरकार मुळेच तर तुझ्या घरात आईबहीणीला, बायकोला १५00 रुपये आम्हीच देतो. तुझ्या बापाला पेरणीसाठी सहा हजार रुपये मोदींनी दिल्याचं बबनराव लोणीकर म्हणाले. या विधानावरून विरोधक त्यांच्यावर टीका करत आहेत. जालना जिल्ह्यातील आपल्या परतूर येथील सोलर योजनेच्या शुभारंभ प्रसंगी केलेल्या भाषणात बोलताना लोणीकरांनी वादग्रस्त विधान केले आहे.

पक्ष कुठलाही असो परंतु त्यांनी शेतकऱ्या विषयी विधान करताना अतिशय जबाबदारीने करायला हवे. नाहीतर फक्त निवडणुका आल्या की त्याच्याविषयी कळवळा दाखवायचा,पाया पडायचे, आणि नंतर मात्र त्याला जितके अपमानित करता येईल तितके करायचे ही पद्धत झाली. आधी म्हणायचे शेतकऱ्याचा सातबारा होणार कोरा.. कोरा.. कोरा त्यानंतर मात्र ३१ मार्च अखेर पर्यंत शेतकऱ्यांनी कर्ज भरण्याचा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवार देतात. आता कर्जमाफी नाही, ज्यांनी कोणी आश्वासन दिले त्यांना विचारा असे विधान केले जाते. परत दुसरे उपमुख्यमंत्री म्हणतात जाहीर केल्या प्रमाणे कर्जमाफी होणारच. परत मुख्यमंत्री म्हणतात योग्य वेळी कर्जमाफी दिली जाईल. कोणाला द्यायची ठरवले जाईल. असे. आता योग्य वेळ कोणती आणि ती कधी येईल असा प्रश्न विचारला जात आहे.

गतवर्षी अतिवृष्टीने झालेले पिकांची नुकसान भरपाई किंवा त्यांना मदत अद्यापही मिळाली नाही. पिक विम्याचे पैसे ही मिळालेले नाही. नियमित कर्ज भरणाऱ्यांना पंचवीस हजार किंवा पन्नास हजार देणार असे जाहीर केले होते. त्याबाबतीत काही निर्णय होत नाही फक्त आशेवर झुलवले जाते.

मी स्वतः जवळपास सोळा वर्ष विशेष वसुली अधिकारी पदावर कामकाज केले आहे आणि त्यामुळे मी शेतकऱ्याचे असे अनेक प्रश्न आणि समस्या जवळून बघितल्या आहेत आणि त्याचा अभ्यास केला आहे. कर्ज बुडवण्याची शेतकऱ्याची मुळातच इच्छा नसते परंतु त्याला पिकत नाही आणि पिकले तर भाव मिळत नाही अशी कोंडी निर्माण करणारी अवस्था असते.

सध्या शहरी आणि ग्रामीण अशी एक दरी निर्माण झाली आहे अर्थातच ग्रामीण भागात शेतकरी आणि मजूर वर्ग तर शहरी भागात मध्यमवर्ग उच्च मध्यम वर्ग नोकरदार धनिक व्यापारी अशी विगतवारी झाली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या गरजा त्यामानाने खूपच कमी आहेत. बऱ्यापैकी माल व्हावा व त्याला भाव मिळावा आणि पुढच्या हंगामा पर्यंत आपले दिवस सुखाचे जावे हीच अपेक्षा असते. मर्यादित गरजा असतात. परंतु शहरीभागात हाय फाय राहणीमान असते, शेतकऱ्याच्या समस्यांशी त्यांना काही देणेघेणे नसते, फक्त त्याने पिकवावे आणि आपण खावे हीच भूमिका असते . दरवर्षी पगारवाढ, वेतनआयोग, दर वर्षा दोन वर्षांनी पर्यटनाची सवलत, सगळे व्यवस्थित असते. त्यांच्या एका शर्ट पॅन्ट,बुट, ची किंमती एवढी शेतकऱ्याला हेक्टरी मदत मिळत असते.

आपण आपले कुटुंब इतर गोष्टींशी त्यांना काही देणे घेणे नसते. वर्तमानपत्रात शेतकरी आत्महत्या करत असल्याच्या बातम्या ऐकतात आणि वरपांगी हळहळ दाखवतात.

शेतकऱ्याला मात्र ना पगारवाढ,ना वेतन आयोग,ना पर्यटन सवलत. त्याचे सर्व जीवन शेतीसाठी समर्पित असते. आणि त्याच्या समर्पण भावामुळे हे सर्व व्यवस्थित सुरू आहे. सरकार कुठल्याही पक्षाचे असेल,उगीच त्यांचा वेळोवेळी अपमान करून अपमानास्पद वागणूक देवू नका.आणि त्याला लाचार समजू नका.दर पाचवर्षांनी नवनवीन आश्वासन देउन तुम्हीच त्यांच्या दारात जातात. त्याची पुर्तता करा.आपण जनतेने सेवक आहोत याचा विसर पडू देवू नका. तो जगाचा पोशिंदा आहे. त्याचे मालक होवू नका.तोच मायबाप आहे. त्याला.. शेती व्यवसायाला, प्रतिष्ठा मिळवून द्या.आपल्याला हे वैभव,पद, प्रतिष्ठा तोच मिळवून देतो नां ? त्याला विसरु नका. त्याचे आशीर्वाद घ्या. तळतळाट घेउ नका.

शेतकरी टिकेल तर शेत पिकेल.

तूर्तास एवढेच.

वक्फ सुधारणा कायद्याविरोधी सभा

# हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून केंद्र सरकारचा निषेध नोंदवा - शेख माजेद

**जालना । प्रतिनिधी -** जुनी ईदगाह मैदान, जालना येथे ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या वतीने वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध शनिवार (दि २८) रोजी शांततापूर्ण निषेध सभा आयोजित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमात देशभरातील नामवंत धार्मिक आणि सामाजिक नेते उपस्थित राहणार असून, संपूर्ण जिल्ह्यातील जनतेम ध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



या पार्श्वभूमीवर एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख मोहम्मद माजेद यांनी जालन्यातील जनतेला शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध सहभागासाठी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत:

कार्यक्रमाच्या यशासाठी आणि वाईट प्रकारांपासून संरक्षणासाठी विशेष दुवा, सदका आणि खैरात करण्याचे आवाहन., म हिलांचा कार्यक्रम दुपारी २ वाजता सिटी लान्स उर्दू हायस्कूलच्या मागे आयोजित करण्यात आला आहे. पूर्ण पर्दा आणि योग्य व्यवस्थेसह महिलांना तेथे पोहोचवण्याची आणि पुन्हा घरी आणण्याची व्यवस्था करावी. झोहरच्या नम ाजेनंतरच आपले व्यवहार, नोकरी बंद करून वेळेत कार्यक्रमस्थळी पोहोचावे. सभा वेळेत, संध्याकाळी ५ वाजता सुरू होईल. पावसाची शक्यता लक्षात घेऊन छत्री, रेनकोट घेऊन यावे आणि भिजलो तरी मैदान सोडू नये., कोणत्याही पक्षाचा झेंडा किंवा दंडा घेऊन येऊ नये. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डचा स्वतःचा कोणताही झेंडा नाही., ही सभा आहे, रॅली नाही. म्हणून कोणत्याही घोषणांसह गटाने येणे टाळावे,. ही आंदोलन सरकारविरोधी आहे, कोणत्याही धर्म किंवा जातीविरोधी नाही. म्हणून कोणत्याही नागरिकाशी वाद न करता संयम ठेवावा., कोणताही घोषवाक्य, बॅनर स्वतःहून न लावता केवळ संयोजकांकडून मि ळालेलीच घोषणा घ्याव्यात आणि केवळ व्यासपीठावरून घोषणा झाल्यासच प्रतिसाद द्यावा., अस्र, मगरीब आणि इशा या तिन्ही नम ाजांची व्यवस्था ईदगाहमध्ये आहे. नजीकच्या मशिदींमध्येही नमाज अदा करून वेळेवर कार्यक्रमात सहभागी व्हावे., कार्यक्रमाच्या शेवटी शिस्तीचे पालन करणे हेच खरे यश आहे. वाहनतळासाठी दिलेल्या जागेवरच गाड्या लावाव्यात आणि स्वयंसेवकांच्या सूचनांप्रमाणेच निघावे., ईदगाहच्या जवळपास राहणाऱ्या नागरिकांनी पायदळच यावे, वाहनांचा वापर टाळावा जेणेकरून वाहनतळावर गर्दी होणार नाही.

या पार्श्वभूमीवर शेख माजेद म्हणाले, आपला निषेध हे आपल्या एकतेचे, शिस्तीचे आणि शांततामय संघर्षाचे उदाहरण असले पाहिजे. चला, सर्वांनी मिळून वक्फच्या रक्षणासाठी आणि संविधानाच्या संरक्षणासाठी सर्वांनी एकत्र यावे.

# टेंभुर्णी सह भागात पाऊसाची दमदार हजेरी

## दुबार पेरणीचे संकट टळले; जास्त पाऊसामुळे पिकांचे नुकसान

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील परिसर व आजूबाजूला थोडा थोड्या पावसानंतर पाऊस गायब झाला होता. शेतकरी यांनी पेरणी केल्या मुळे कवळ्या पिकांना पाऊसाची गरज भासू लागली या पावसाच्या चिंता मुळे शेतकरी हे चिंताग्रस्त झाले होते.या मुळे पाऊसाची प्रतिक्षा त्यांची वाढली होती. अमावास्येच्या दिवशी बुधवारी संध्याकाळी आणि रात्रभर चांगला पाऊस झाल्याने व दुसऱ्या दिवशी गुरुवारी ही चांगल्या पाऊसाने पिकांना चांगली उभारी घेतली असून सध्या तरी दुपार पेरणीचे संकट टळले असून मात्र जोरात झालेल्या पाऊसाने उशिरा झालेल्या पेरणी करण्यात आलेल्या शेतकरी यांच्या पिकांना मोठा फटका बसलेला असून काही शेतकरी यांचे नुकसान ही झाल्याचे दिसून आले.

मागील वर्षी पहिली मक्का आणि हिवाळी मक्का चांगली झाली असून त्यांना जवळपास २००० चा चांगला भाव भेटल्याने मक्का चां पेरा वाढला असून कपाशी महत्वाचे समजले जाणारे पीक चे क्षेत्र घटले असून सोयाबीन ही भरपूर लागवड झालेली दिसून आली आहे. या वेळी हवाम ान खात्याच्या अंदाज मुळे शेतकरी चांगल्या पावसाच्या आशेने शेतीत जोमाने उतरला असून निसर्गाने आणि वरून राजाने साथ दिली तर हे वर्षी ही चांगली उत्पने घेऊन जीवन सुजलम सुफलम करू या साठी जीवाचे रान करत आहे. देव त्यांना नक्की साथ देणार अशी त्यांनी पांडुरंग चरणी प्रार्थना



केली आहे. टेंभुर्णी येथील आंबेगाव रोड वरील नदीने उग्र रूप धारण केले असून दुथडी जोमाने वाहत असून या मुळे खटकपूर्ण धारणा लां मोठा फायदा होणार असून या धरणाची पातळी सतत वाढत असून पुढील पाणी टंचाई दूर होण्यास मदत होणार आहे.

# जिल्हा परिषद प्रशाला परतुर विद्यार्थ्यांचे नेत्र तपासणी करिता एक वर्ष दत्तक

**परतूर । प्रतिनिधी -** दृष्टी लॉयन्स नेत्रालय द्वितीय वर्धापन दिनानिमित्त जिल्हा परिषद प्रशाला शाळेतील




विद्यार्थ्यांचे नेत्र तपासणी व याविषयी आजारासाठी एक वर्षाकरिता मोफत सेवा देण्यात येणार आहे. शाळेचे शालेय शिक्षण अध्यक्ष, दया काटे. मुख्याध्यापक, गणेश राठोड. रमाकांत बरीदे. कल्याण बागल. यांना नेत्रालयाचे पत्र देऊन वर्षभर मुलांच्या डोळ्यांची मोफत तपासणी ची हमी घेतली आहे. याप्रसंगी

ऑपरेशन झालेल्या जिंतूर तालुक्यातील रुग्णाचा सन्मान करण्यात आला त्याचबरोबर नेत्रालयातील सर्व कर्मचाऱ्यांचा सन्मान करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला .या कार्यक्रमासाठी लॉयन्स चे बहुप्रांती अध्यक्ष सन्माननीय सुनीलजी देसरडा मा प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया मा प्रांतपाल विजयजी बगडिया श्याम लोया मनोहर खालापुरे सुभाष देविदान सुनील बियानी महेश होलानी प्रवीण जेथलिया बबनराव उनमुखे परमेश्वर राजबिंडे संगीता खोसे रेवती राखे द्वारकादास मुंदडा प्रमोद टेकाळे परभणी लायन आय हॉस्पिटलचे मुंदडाजी सुकलाजी व नीरज पारख परतूत सर्व लायन सदस्य नेत्रालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.